भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत निवासी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमावरील प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबत............

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१८/प्र.क.५९/उद्योग-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०२ मार्च, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र. १३३/उद्योग-८, दि. ११.०२.२०१६.
२) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र. १३३/उद्योग-८, दि. ११.०५.२०१६.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-२०१४/४४०/प्र.क्र.६६/१४/१२-अ, दि.०१ नोव्हेंबर,२०१४ व दि.३०.०४.२०१६.
४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१८/प्र.क्र. ५९/उद्योग-८, दि. १९.०५.२०१८.
५) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र. उसं/एससी-एसटी योजना/मऊविकेऔ/प्रका/२०१८/ अे-४१४, दि. १८ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्त राज्यातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती उद्योजकांना उत्तेजन देऊन त्यांना स्वयंपूर्ण व आर्थिक दृष्टयां स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय दि. ११.०२.२०१६ अन्वये नवीन योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर योजनेतील परिच्छेद १४ येथील कौशल्य विकास योजनेनुसार अ.जा./अ.ज. प्रवर्गातील उद्योजकांच्या ज्ञानात वाढ करणे व सामाजिक विकास करण्याच्या उद्देशाने माहराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MIED) यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत (अ.जा./अ.ज.) सुशिक्षित बेरोजगारांसाठी सन २०१८-१९ या वर्षाकरिता ६ आठवडे कालावधीचे (४५ दिवस) निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (RESDP) व १८ दिवसाचे निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (REDP) राबविण्यात येत आहेत. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम १ ते ३ महिन्यांच्या कालावधीकरिता आखून त्याद्वारे अजा/अज प्रवर्गातील लाभार्थ्यांमध्ये उद्योजकीय मानसिकता रुपवून त्यांना यशस्वी उद्योजक घडविण्याकरिता सदर योजनेअंतर्गत कौशल्य विकास योजनेस (निवासी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम) मान्यता देणे तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या एकूण रूपये १०.००/-कोटी इतक्या प्रस्तावित खर्चास मान्यता देण्याबाबत उद्योग संचालनालयाने संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये विनंती केली होती. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च झालेल्या रु.५९५.३५ लक्ष एवढया खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेतील परिच्छेद १४ येथील कौशल्य विकास योजनेनुसार अ.जा./अ.ज. प्रवर्गातील उद्योजकांच्या ज्ञानात वाढ करणे व सामाजिक विकास

करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MIED) यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०१८-१९ या वर्षाकरिता ६ आठवडे कालावधीचे (४५ दिवस) निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (RESDP) व १८ दिवसाचे निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (REDP) राबविण्यात येऊन, त्याद्वारे अजा/अज प्रवर्गातील लाभार्थ्यांमध्ये उद्योजकीय मानसिकता रूजवून त्यांना यशस्वी उद्योजक घडविण्याकरिता सदर योजनेतंर्गत कौशल्य विकास योजनेस (निवासी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम) मान्यता देण्यात येत आहे. तसेच शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) या प्रशिक्षण संस्थेद्वारे ०६ आठवडे कालावधीचे (४५ दिवस) निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (RESDP) व १८ दिवसाचे निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (REDP) यावरील खालीलप्रमाणे पुर्ण झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमावरील प्रस्तावित करण्यात आलेल्या एकूण रु.१०.०० कोटी खर्चापैकी प्रत्यक्ष झालेला खर्च रु.५९५.३५ लक्ष (अक्षरी रु. पाच कोटी वीस लाख छप्पन्न हजार फक्त)) इतक्या खर्चास खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

उपरोक्त संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयास अनुसरुन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद यांचे मार्फत विभागीय स्तरावर राबविण्यात आलेल्या व सुरु असलेल्या प्रशिक्षणावर प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी रु.१५००/- प्रमाणे आतापर्यंत प्रत्यक्ष केलेल्या खालीलप्रमाणे खर्चाचा व **<u>प्रशिक्षण पूर्ण झालेल्या कार्यक्रमांचा तपशिल (१८ दिवसाचे निवासी उद्योजकता कार्यक्रम)</u>**

अ.क्र.	**प्रवर्ग**	**कार्यक्रम तपशिल**	**प्रति प्रशिक्षणार्थी**	**एकूण लाभार्थी प्रशिक्षणार्थी**	**एकूण खर्च (रुपये लक्ष)**
१	अनुसुचित जाती	१८ दिवसांचे निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (REDP)	१५०० प्रति दिन / प्रति लाभार्थी	१९२८	५२०.५६
२	अनुसुचित जमाती	१८ दिवसांचे निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम	१५०० प्रति दिन / प्रति लाभार्थी	२७७	७४.७९
			एकूण	**२२०५**	**५९५.३५**

३) सदर मागणीपोटी आतापर्यंत झालेला प्रत्यक्ष खर्च रु.५९५.३५ लक्ष (अक्षरी रूपये पाच कोटी पंच्च्याण्ण लक्ष पस्तीस हजार फक्त) इतका खर्च मागणी क्र. के-७, मुख्यलेखाशिर्ष २८५२ उद्योग ८० सर्वसाधारण ७८९, अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०१) अनुसूचित जातीच्या उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रोत्साहन योजना (योजनांतर्गत) (२८५२ ए ००४) या लेखाशीर्षाखालील सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील मंजूर केलेल्या तरतूदीतून रु.५२०.५६ लक्ष (अक्षरी रु. पाच कोटी वीस लाख छप्पन्न हजार फक्त) तसेच "मागणी क्र. टी-५, मुख्य लेखाशीर्ष-२८५२, उद्योग ८०, सर्वसाधारण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) अनूसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना (योजनांतर्गत) २८५२ ए ०१३) " या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४) सदरची तरतूद आहरित करण्यासाठी लेखाधिकारी, उद्योग संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व विकास आयुक्त (उद्योग) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबत तसेच महालेखापाल यांच्या लोख्याशी खर्च ताळमेळ घालण्याची कार्यवाही करावी. सदर निधी प्रत्यक्ष्यात वितरित झाल्यानंतर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल यांना पाठवून त्याची प्रत तसेच प्रशिक्षण कार्यक्रमाचा वार्षिक मूल्यमापन अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्याची राहील.

५) हा शासन निर्णय,वित्तीय अधिकार नियम पुस्तिका -१९७८, भाग-पहिला,उप विभाग-एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७ एप्रिल,२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उपविभाग-चार मधील अ.क्र.१० अन्वये तसेच प्रस्तुत प्रयोजनार्थ शासन निर्णय दि.११.०२.२०१६ मध्ये वार्षिक रु.५.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली असून, सदर खर्च विहित मर्यादेपेक्षा जास्त होत असलयाने, उदयम भांडवल निधीसाठी करण्यात आलेल्या तरतुदीमधून निधी वळविण्यास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका -१९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन मधील अ.क्र. १ येथील परिच्छेद १६२,१६३ व १६४ ला प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६) प्रमाणित करण्यात येते की, हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३ दि.०२/०४/२०१८, अर्थसं-२०१६/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.२५/०१/२०१९ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/२०१८-२०१९/(प्र.क्र.२३)/प्रशासन-१,दि.०६.०४.२०१८ व क्र.पुरक-२०१९ / प्र.क्र.२३ / प्रशा-१, दि.१/२/२०१९ ला अनुलक्षून सदर शासन निर्णयातील तपासणी सूचीतील लागू अटींची पूर्तता होत असल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३०२११२९०४९३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

Shraddha Deven Kocharekar

Digitally signed by Shraddha Deven Kocharekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef70683916299eab51c867c5a13147d142a80, cn=Shraddha Deven Kocharekar
Date: 2019.03.11 16:02:16 +05'30'

(श्रध्दा कोचरेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व संबंधित मा. मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.

६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर.
११. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.
१६. विकास आयुक्त तथा उद्योग संचालक, नवीन प्रशासन इमारत, पहिला मजला, मंत्रालय, मुंबई.
१७. Dalit Indian Chamber of Commerce & Industry.
१८. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), औरंगाबाद.
१९. सर्व कार्यासने, उद्योग विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.